# माझे निर्गुणी कुमारकाका

माझी आणि कुमार गंधर्वांची ओळख ७८ आर् पी एम् च्या काळापासून आहे. “मै जान्यू नाही", “साँवरा म्हारी साँवरा" तसेच "रंगीली घन" अशा भजनांनी रोपण झालेली व पुढे ४५ आर् पी एम्  सोहनी भटियारमध्ये म्हारूजी भूलो न म्हाने व देसकारमधल्या जा जा रे भँवरा जा ह्या रेकॉर्ड मुळे वृध्दिंगत झालेली ही सांगीतिक ओळख ३३ मधल्या संजारीतील 'संजा सुन ले" आणि बागेश्रीतील 'सखी मन लागे ना' मुळे पुढे फोफावली. कोकाकोला पिताना देखील खिशातले नाणे चाचपून पहावे लागे अशा दिवसात पै पै करून ह्या रेकॉर्ड विकत घेतल्या आणि मागे वळून बघता त्यांच्या संगीताची विविध रूपे पुढील आयुष्यांत जमवतच राहिलो. काचेच्या त्रिकोणी खेळण्याला फिरवत राहिलो की नवनवी डिझाइन्स दिसत राहतात आणि आपले कुतूहल ताणत राहतात. कुमारकाकांच्या गाण्यातील "वाक्यरचना" असे कुतूहल नेहमीच ताणत राहिल्या आणि विस्मय, विद्युतचापल्य, सृजनशीलतेची परमावधी सारख्या आनंद देत राहिल्या.

ही भावना संगीतापुरतीच मर्यादित राहिली नाही हे माझे नशीब असेच म्हणायला हवे. आपापल्या आयुष्यात काही व्यक्ती प्रथमदर्शनीच संमोहून टाकतात, भावतात. भावणे हा शब्द संमिश्रीत भावना दर्शवतो असे मला वाटते. आवडणे आणि त्यामधे "अत्तर सुगंधा" सारखे दरवळणे, भावनिक जुळवणूक होणे असे काहीसे. गाण्याच्या जातकुळी, त्याचा पोत, त्यांच्या अभिव्यक्तीचे वेगळेपण ह्यामधून जरी निर्माण झालेले असले तरी माझे भावनात्मक कुमारांमधे आजतागायत रेंगाळणे हे त्याच्यामुळे झालेले आहे असे मला वाटत नाही. जुजबी, तथाकथित ओळखीपासून, तो त्यांची आठवण नाही असा दिवस नाही" असा जो प्रवास, ही जी कालक्रमणा ह्याच्यातच "मला गमलेले कुमार गंधर्व" अंतर्भूत आहे कसे, कळत नकळत घडले ते. He came, he saw, and he conquered अगदी शब्दश: ह्यासारखे.

एखादी व्यक्ती तिच्या कार्यामुळे आवडते या पूर्वी त्या कार्यामुळे ती आवडावी असे वाटते का? एक मात्र खरे की मनाच्या गाभाऱ्यात तिचे व्यक्तिमत्त्व तिचे ती "आननी" कशी असेल असे आडाखे बांधले जातात. एक नैसर्गिक प्रक्रियाच आहे ती. आणि त्या आडाख्याबरहुकूम अगदी मिळती जुळती छबी जर आपल्याला पाहायला आणि

यथावकाश न्याहाळायला मिळाली तर आनंद द्विगुणित होतो. शतगुणित होतो. दुग्धशर्करा, सोने पे सुहागा सारखा योग. कुमारकाका सांगावेसे वाटले गाण्यामुळेच नव्हे तर व्यक्ती म्हणूनही निरतिशय गमले. आणि माझ्या घरात व मनाच्या कोंदणात कायमचे घर करून राहिले. १२ जानेवारी १९९२ नंतर माझ्या कानांनाच नव्हे तर माझ्या व्यक्तीमत्वाच्या काही पैलूंना कायमचे पोरके करून टाकले. “शुभ्र काही जीवघेणे" असे वाटायला लावनारे कुमारकाका.

त्यांची वैयक्तिक ओळख व्हायला दोन व्यक्ती कारणीभूत आहेत. शिवाजी पार्कला "आदर्श क्लासेस" चा मालक मधू आठल्येकडे दादा आचरेकर येत असत तसे सत्यशील देशपांडेही - ( सत्यशीलला आम्ही सतीश म्हणत असू) येत असे. आदर्श क्लासेस हा आमचा म्यूझिकल कट्टा. माझे "मौजे"शी सख्खे नाते असल्याने असेल कदाचित, माझी वैचारिक पातळी बरीच वरची गणली गेली असावी. सत्यशीलचे वडील स्व. वामनराव देशपांडे. मौजेच्या 'घरंदाज गायकी" नावाच्या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक. कुमारजींचे मुंबईत वास्तव्य बऱ्याचदा त्यांच्याकडेच असे. “वामनराव देशपांडे" ह्या शिडीवरून मी कुमार गंधर्व नावाच्या मुक्कामावर पोचलो. आणि आपल्या आडाख्यांशी जुळलेल्या छबीच्या क्षणार्धात प्रेमात पडलो ही वस्तुस्थिती आहे. चेहऱ्यावर एक मिस्कीलसे स्मित. स्वच्छ लेंगा व झब्बा, सहचरीसारखी शबनमची पिशवी, त्यात वह्या व पानाची जय्यत तयारी असलेली डबी, नेटकेपणाचा वस्तुपाठ जणू असे कुमार. खुर्चीवर स्थानापन्न झालेले, धारदार गंभीर आवाजात विद्वत्ता प्रचुर चर्चा करणारे वामनराव वा त्यांच्याशी किंचित नेझॅलिटी असलेले मधुर पण कुठलीतरी लगबग असावी असे चर्चा करणारे, कमी पण नेमके बोलणारे कुमारकाका लोडाशी टेकलेले, बाजूला वसुंधराताई. हे चित्र अजून कोरून ठेवलेले आहे. ह्रदयात अगदी जपून. पुस्तकाच्या पानात मोरपीस ठेवावे तसे.

माझ्या वैयक्तिक बाबतीतला आपलेपणा, त्यांच्या लेखी असलेला आपलेपणा निर्माण व्हायला कुमारांचे खऱ्या अर्थाने सुहृद असलेले दादा आचरेकर आणि सतीश हेच कारणीभूत झाले हे स्मरलेच पाहिजे. आणि त्यांच्या आपलेपणाचा अनुभव जवळ जवळ त्यांच्या अखेरपर्यंत अनुभवला हेही स्मरले पाहिजे. त्यांचा आमच्या साऱ्या

भागवत कुटुंबियांशी संबंध "अनूपरागविलास" साठी त्यांना "मौजेत" व पर्यायाने तात्याकाकांकडे (श्री. पु. भागवत) घेऊन वामनराव देशपांडे आले हेही स्मरले पाहिजे.  "अनूपरागविलास" च्या दिवसांत मी "श्री पुं" कडे रहात असे त्यामुळे ते मंतरलेले दिवस माझ्यावर बरेच संस्कार करून गेले. बऱ्याचदा कुमारकाका त्यांना जे म्हणायचे आहे ते गाऊनही दाखवीत. त्याच्यावर चर्चा होई वेळप्रसंगी संस्करणही. एक प्रकारचा आव्हानात्मक रचनेचा तो काळ होता. ह्या पद्धतीचे "मौजे" चेही ते पहिलेच पुस्तक. अभिव्यक्तीच्या फरकासाठी काही नवीन मेट्रीसेस, नवीन वळणाच्या करून घेतल्या आणि पद्मा सहस्त्रबुद्धे यांनी मुखपृष्ठ केलेले एक आगळे वेगळे रेखीव पुस्तक तयार झाले. कधी चिरमुले काका, कधी वसुंधराताई आदींच्या उपस्थितीमुळे अजूनच मजा येई. सांगीतिक संस्कारांनी मी फार समृद्ध झालो त्या दिवसांत. परंतु माझ्या तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या मुलास वैयक्तिक पैलू पाडण्यास कुमारकाकांचे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे इतर अनेक गुण खूप कारणीभूत झाले. ते लाघवी व्यक्तिमत्त्व पुढे पुढे खूप देते झाले आहे.

माझ्या धाकट्या बहिणीचे, ज्योत्स्नाचे लग्न घाटले होते. मी सर्जरीमधील रेसिडेंसीमधे व्यग्र होतो तेव्हाची गोष्ट. साऱ्या आमंत्रणामधील दोन आमंत्रणे मी स्वत: लिहिली एक जयवंत दळवींचे आणि दुसरे कुमारकाकांचे. त्यांना त्यांच्या पत्रिकेवर आर्जववजा पत्र लिहिले. त्यावेळी "गीतवर्षा" च्या तालमी चालू होत्या व कुमारकाका मला वाटते शिवाजी पार्कच्या "पार्क वे" हॉटेलमधे उतरले होते. त्यांनी सत्यशीलला चाचपून पाहायला सांगितले की या निमित्ताने त्यांचे गाणे व्हावे अशी तर आमच्या भागवत कुटुंबियांची इच्छा नाही? ते सतीशला म्हणाले ही भागवत मंडळी फार संकोची आहेत, इच्छा असली तरी व्यक्त करणार नाहीत. सतीश जरा आजमावून पहा, तसं असेल तर आपण करूया गाणे. त्यांनी लग्नास यावे आणि सहभोजनाचा आनंद द्यावा एवढीच माफक इच्छा होती आमची त्याला अनुसरून ते आवर्जून आले व आमची इच्छा पूर्ण झाली पण मी व्यक्तीश: त्या त्यांच्या सतीशकडे केलेल्या पृच्छेने आयुष्यभरासाठी विकला गेलो.

प्रसंग लहानसेच असतात खरे पन त्यांची छाप फार जोरदार असते. त्यांना पुण्याहून मुंबईला नेण्यासाठी एकदा मी खास मुंबईहून गाडी घेऊन आलो होतो. कुण्याच्यातरी घरच्या लग्नाच्या गाण्यासाठी ते पुण्याला आले होते

व मुंबई इंदौरचे बिकिंग झाले होते पण पुणे मुंबईच्या सोयीसाठी मी आलो. रात्री जेव्हा परतत होतो तेव्हा दादा आचरेकर काहीतरी बुध्द्याच चुकीचे गुणगुणू लागले. वसंता! ते असे नाही तर असे हवे असं गाऊन दाखवत सुधारणारे कुमारकाका. बोलता बोलता संभाषण "त्रिवेणी" आणि "मला उमजलेले बालगंधर्व" या विषयांवर आले. मी लहान तोंडी मोठा घास होतो अशी प्रस्तावना करून त्यांना म्हणले काका ! हे दोन्ही कार्यक्रम मला जमले नाहीत. त्यांनी विचारले का रे !

मी म्हणालो, “त्रिवेणीच्या तिन्ही संतांनी त्यांच्या भजनांची, रचनांची "तर्ज" बांधणी बहुधा तुमच्या कानात येऊन सांगितली असावी असा भास होतो. त्यातली प्रत्येक रचना आपल्यापरीने स्यायत्त आहे, सुमधुर आहे, पण ती एकत्र करून सादरीकरणामध्ये "एकसंध" असे स्थापत्य होत नाही असे मला वाटते. सारे "पॅची" वाटले. तसेच बालगंधर्वांचे माझ्या नशिबी फार सुंदर चित्र नाही. प्रेसमधे वार्षिक त्यांचे गाणे होई पण वार्धक्य, विकलांगता, कवळीमुळे उच्चार नीटसे न होणे असे काहीसे. त्यांच्या उमेदीचे गाणे भाग्य मला नाही. ७८ आर् पी एम् च्या तबकड्यातून त्यांची गायकी समजण्याएवढी उमज माझ्याजवळ नाही. तरीही कार्यक्रम ऐकताना मला मी 'कुमार गंधर्व' ऐकतो आहे असेच वाटले.

मी माझे प्रांजळ मत मांडत होतो. जनसामान्यांचा एक मामुली श्रोता या नात्यानेच मी बोललो. त्यामधे असलेला एक प्रामाणिकपणा जाणवूनच बहुधा ते काहीसे विचारात पडले. माझ्या बोलण्यातली ग्राह्यग्राह्यता हा मुद्दा महत्वाचा नाही. प्रांजळ मतावर ऐकून घेण्याची व त्याला आपला विचार देण्याची त्यांना वाटलेली आवश्यकता, अजूनही, मला त्यांच्या पश्चातही भावते. त्यांनी केलेल्या अगणित प्रयोगांबद्दल अनेकांनी, दिग्गजांनी प्रकांड पांडित्य केले आहे. परंतु सतत प्रयोग करत राहण्याची त्यांच्या मनात असलेली ही निकड, ही वाटणारी बोच, एक प्रकारची घुसमट मला अतोनात भावते. हे जे divine dissatisfaction आहे ते मला सतत अस्वस्थ करत आले आहे. लयीची व्याख्या केली आहे, लय ही नियमितपणे, सातत्याने, नवनिर्माण करत असते. तिला जुन्यासाठी वेळच नसतो. लयीचा हा स्थायीभाव आहे. कुमारकाकांकडे बघितले की हाच विचार अंतर्बाह्य पटतो. ते प्रयोग ना करते तर फार "मुष्किल" झाले असते त्यांना.

“संत तुकाराम" हा त्यांचा कार्यक्रम सांप्रदायिकतेला सरावलेल्या आपल्या कानांना तेवढा जमत नाही. हातात कितीही संगीतातले एक वाद्य तुकाराम घेऊन फिरत असले तरी "जैतकल्याण" परज सारखे राग आपल्या

अभंगासाठी तुकारामबुवा वापरणार नाहीत असा विचार येतो. पण संतांच्या भगवंतांबद्दलच्या भावनांमधला एकसुरीपणा (monotony) कुमारकाकाच्यासारखा अमान्य करून विचार करायला लागल्यावर "तुकारामावर" केलेला कार्यक्रम एका वेगळ्या प्रकाराने भावू शकेल हे पटते. नवतेला सांप्रदायिकतेचे उगमसस्थान असले तरी सांप्रदायिकता नवीन विचारामुळेच सातत्य राखून असते. एरवी तो प्रवाहच राहत नाही, हेच वारंवार जाणवत राहते.

ही जी मानसिक निकड असते असे अगोदर म्हणालो ती निकडच जुन्या मळवाटाच मलिन करण्यापेक्षा नवीन विचार, नवीन दिशा, रचना (forms) मनात मंथने करायला लावते. राग हा अरूप असतो, “कायदे कानू" असूनही अरूप असतो, मुक्त असतो. त्याला नवनवीन रूपे, अभिनिवेष,अस्तित्व देत असते बंदिश आणि तरीही काही तरी सांगून सांगून टाकायचे राहिले आहे अशा चुटपुटीतून काव्यविलासाचा आधार न घेता सुचवतो तो "तराणा"अशा प्रकारच्या अभिव्यक्ती (concepts) मी दुसऱ्या कोणाकडूनही ऐकलेल्या नाहीत. दोन जुडलेल्या तंबोऱ्यांमधे माझा "कॅनव्हास" असतो त्यात मी चित्र काढतो, रंग भरतो, माझे गाणे तसेच उत्स्फूर्त सादर व्हायला हवे असाच माझा यत्न असतो. ह्या अशा सारख्या विचारप्रणालीमुळे मला त्यांचे आगळेवगळे रूप दिसते, ते माझ्या लेखी नुसतेच बुद्धिवान नव्हते तर, संगीतक्षेत्रात बुद्धिजीवी होते. बुद्धिजीवी आणि बुद्धिवंत यात माझ्या मते जमीन अस्मानाचा फरक आहे.

ह्या त्यांच्या अभिव्यक्ती जशा मनाला व बुद्धीला पटतात व चटका लावून जातात. तशी एक फार मोलाची आठवण माझ्यापाशी आहे. किस्सा सत्यशीलच्याच घरी घडलेला. नाही म्हणायला वामनराव देशपांडे व कविवर्य वसंत बापट व मी असे चौघेच होतो तिथे. माणूस जेव्हा नेहमीचा श्वासोच्छ्वास करतो, दर श्वासागणिक जेवढ्या हवेचे श्वासात व उच्छ्वासात परीवहन होते, तेवढ्या हवेला वैद्यकशास्त्रात vital capacity अशी संज्ञा आहे. प्रदीर्घ श्वास व प्रदीर्घ  उच्छ्वास यांमधे त्यांच्यात अर्थातच खूप भरणा होतो. मी डॉक्टर असल्याने, त्यांची (कुमारकाकांची) परवानगी घेत विचारले. तुमच्या फुफ्फुसांवर शस्त्रक्रिया झालेल्या असताना तुमची vital capacity व इतर  श्वासोच्छ्वासांची परिमाणे बघून मला हैराण व्हायला होते.

मला म्हणले - कोणी सांगितले माझ्या फुफ्फुसांवर शस्त्रक्रिया झाल्या म्हणून. माझ्या त्यावेळी अलीकडेच झालेल्या शस्त्रक्रियेचा व फुफ्फुसांचा काहीही संबंध नाही.

मी म्हणालो मग एव्हढ्या साऱ्या वदंता ? तर ते म्हणाले अरे ! कुठे आणि कुणाला सांगत बसणार? एक लक्षात घे, चिमणीचे फुफ्फुस केवढेसे पण हैराण करते की नाही. अरे! हैराण करायला मोठे फुफ्फुस लागत नाही. तसे विचार केले पाहिजेत हैराण करायला. त्या दिवशी कुमारकाकांची उंची माझ्या लेखी गलिव्हर एवढी झाली. कुठल्याही रागात त्यानी मांडलेल्या पंक्ति (phrases), वापरलेले ताण हे साऱ्यांना का हैराण करतात ह्याचेच ते इंगित आहे. विचारच सर्वांना हैराण करणारा आणि त्याच्या अर्ध्या वचनात फिरणारा गळा हे दोन्हीचे मिश्रण अपरंपार हैराण करते.

मैफिलीचे आखणे, व सादरीकरण कसे असावे ते किती कातीव असायला हवे ह्याचे उत्तम उदाहरण कुमारकाका होते.  कुठलीही कलाकृती संपूर्ण असतच नाही असं एकदा मान्य केलं की पुनरुक्तीचा धोकाच

नाही व म्हणूनच आजच्या मैफिलीत काय व किती दाखवायचे याचे कातीव आयोजन आधीच होत असे, इतकेच नव्हे तर त्या मैफिलीत सादर करण्याच्या ऐवजाचा एकसंध विचाराचा अगोदरच आलेख मांडलेला असायचा. एक गंमतशीर प्रसंग आहे. जगन्नथबुवा पुरोहितांच्या पहिल्या पुण्यतिथीचा कार्यक्रम झाला त्यात कुमारकाका पुरोहितबुवांनी दिलेला "कौसी" गायले. मी व माझ्या शेजारी कविवर्य वसंत बापट. अगदी जमून गायले. मी मध्यंतरात बापटकाकांका म्हणले "काका! कुमारकाकांना 'शून्य गढ शहर' गायला सांगा ना!" बापट काका म्हणले नको रे! कुमारला आवडत नाही असं सांगितलेलं. बोलणे तेव्हढ्यावरच संपले खरे पण शून्य गढचे प्रलोभन फारच मोठे. बापटकाकांनी न राहवून तशी विनंती केली. माइकवर हात ठेवून कुमारकाका हळूच म्हणाले, "बापट! असं लहान मुलासारखं नाही करायचं." ऐकल्यावर मलाच वाईट वाटलं व तसं मी म्हणालो देखील - उगाच बोललात बापटकाकांना, खरंतर ते मी सुचवलं होतं. कुमारकाका म्हणाले तुला ऐकायचं होतं होय, अरे नक्की ऐकवीन, पण काय आहे शून्य गढ नंतर काही गाता येत नाही, एकदम सन्नाटा येतो. मैफिलीच्या प्लॅनिंग अगोदरच ते फर्माइशी विचारत व मैफिलीत सामील करण्याचा यत्न करत. पण एकदा आराखडे ठरले की त्यात बदल म्हणून होत नसे. सगळे आखीव, रेखीव बेतलेले वस्त्र जणू. ढगळपणा अजिबात न आवडणारे कुमारकाका, तबलजीच्या तबला-डग्ग्यांच्या वाद्यासुद्धा नीटस लागायच्या त्यांना. तबल्याच्या प्रत्येक बोलाची स्वच्छ अभिव्यक्ती न झालेली थोडीच खपणार होती.
मी डॉक्टर म्हणून मध्य आखातात गेलो हे त्यांना कुठेतरी रुचले नसावे. सुट्टीवर आलेलो असताना जेव्हा जेव्हा म्हणून भेटलो तेव्हा तेव्हा बास नाही का झाली दुबई, या आता परत असे नेहमी म्हणत. मी बोलावले तर दुबईला नक्की येईन व गाईन असेही सांगत. जरी दुबईला त्यांना नेण्याचे व हात दाखवून अवलक्षण करण्याचे धैर्य माझ्यात नव्हते तरीही. हा अगोचरपणा मी करू धजलो नाही. दुबईतल्या श्रोतृवृंदांच्या अभिजात संगीताची संकल्पना काय होती याचा मला अंदाज होता. म्हणूनच हा विचार मी मनात येऊच देत नसे. "आम्ही पण शास्त्रीय संगीत ऐकतो" हे मिरवणारा एक वर्ग असतो, त्यात चपखल बसणारे दुबईकर कुमारकाकांसारख्या मनस्वी कलाकाराला अजिबात रुचले नसते.
शास्त्रीय संगीत ऐकण्याची प्रगती होतच असते जसजसे ऐकत जावे तसतशी. एका अशा "मुकामा"वर मला संगीताचे व्याकरण आता यायला हवे असे वाटू लागले. प्रचलित रागांचा "माहौल" उमजू लागल्यावर त्यातले बारकावे अधिक गंभीरपणे अभ्यासायला हवेत असे वाटू लागले. पु. ल. तेव्हा दुबईत आले होते. त्यांना मी माझा प्रॉब्लेम सांगितला. मला गाणे (संगीत) भावते ना, ह्रदयाला भिडते ना, मग बस झाले. व्याकरणाच्या फंदात उगाच पडू नये असे त्यांचे मत . तरी मला स्वस्थ बसवेना. मी शेवटी कुमारकाकांशी हा प्रस्ताव मांडला. ते त्यांच्या थोड्याशा लगबगीने म्हणाले, वा छान, जरूर शीक, शिकणे हे चांगलेच. नाहीतर असे कर माझ्याकडे देवासला ये मीच शिकवीन. मला डोळस बनवायला ते तत्परतेने राजी होते. मी आजतागायत हरखून गेलो आहे त्याने. यूरॉलॉजी शिकण्याच्या व्यापात मी कसा जाणार होतो देवासला इतक्या फुरसतीने. ते मात्र मनापासून तयार होते. मी एकदा त्यांना म्हणालो मला शुद्ध सारंग व बिहाग आवडत नाहीत. एखाद्या लहान मुलाला बळेच दटावावे तसे तोंडावर बोट ठेऊन म्हणाले, "श्श्शऽ ऽ! असे म्हणू नये. जणू संगीत ऐकणाऱ्याने असे म्हणणेच चुकीचे होते. मला म्हणले, देवासला ये, मी ऐकवीन तुला दोन्ही मग तू असं नाही

म्हणणार. जणू माझ्यासारख्याला संगीतातली अमुक गोष्ट न आवडणे त्यांच्या कल्पनेबाहेरचे होते "असं कसं शक्य आहे" अशा कोटीतले. किणी रेकॉर्डिंग केलेले त्यांना खपत नसे असे म्हणतात. मला मात्र जे जे स्कूल ऑफ आर्टच्या रूपभेदचा कार्यक्रम रेकॉर्ड करण्याची परवानगी त्यांनी दिली होती. किंबहुना मध्यंतरात "बरे चालले आहे ना तुझं!" अशी चौकशीही केली होती. संगीताचा व्यापार चालणाऱ्या दिवसात माझ्याकडून असला अधमपणा होणार नाही असा विश्वासच नव्हता का तो? आणखी गंमत म्हणजे त्या मैफिलीत शेवटाला ते "शून्य गढ शहर" हे निर्गुणी भजन गायले.

माझ्या वैयक्तिक पातळीवरचे "कुमारकाका" असे आहेत, त्यांच्या गाण्यातून, त्यांच्या परफेक्शनच्या प्रयत्नशीलतेतून, त्यांच्या प्रयोगशीलतेच्या हव्यासातून, मानसिक निकडीतून "अनूपरागविलास" च्या काळातल्या तात्याकाकांकडील (श्री. पु.) मंतरलेल्या दिवसातून, माझ्या वैयक्तिक संबंधातून, जिव्हाळ्यातून, त्यांच्या शिस्तबद्धतेतून, आणि ते असताना भारलेल्या आजूबाजूच्या वातावरणातून, सडा पडावा अशा प्रसन्नतेतून, आगळ्यावेगळ्या विचारातून, स्तिमित करणाऱ्या विचारांच्या कुवतीतून, मला माझ्यापुरते खूप मिळाले आहेत. जेवढा जेवढा म्हणून विचार करावा तेवढा भरून पावल्याची जाणीव शिल्लक राहते. माझ्या बाबतीत माझ्या "श्रुती" आणि व्यक्तिमत्त्वाची एक बाजूच पोरकी झाल्याची जाणीव होत राहते. एक प्रकारचा लकवा आल्यासारखा वाटत राहतो.

माझ्या आयुष्यात पुरुष गायकांमधे तीन गुरुवर्यांचे जबरदस्त संस्कार माझ्यावर आहेत. एक प्रकारचा पगडा आहे. गंगेच्या घाटावर शुचिर्भूत संथेची आठवण करणारी मल्लिकार्जुन साहेबांची गायकी, तशीच स्वरभरतीची वातावरण ओतप्रोत भरून टाकणारी, काळजाचा ठाव घेणारी भीमसेनजींची गायकी, या इतर दोघांमुळेही मी खूप विद्ध झालो आहे पण तरीही "दूजेके संग नाही जाऊं जी" असे म्हणायला लावणारे कुमारकाकाच, हेही तितकेच खरे.